पोलीस उप अधीक्षक कार्यालय ★ ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

दिनांक ११/१२/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक राजकुमार उत्तमराव चांदणे, राखीव पोलीस उपनिरीक्षक, पोलीस मुख्यालय, औरंगाबाद शहर यांनी ६०००/- रु लाचेची मागणी केल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी चे नांव हुद्दा | :- | राजकुमार उत्तमराव चांदणे, वय ५८ वर्षे, पद- राखीव पोलीस उपनिरीक्षक, पोलीस मुख्यालय, औरंगाबाद शहर.<br>रा. अधिकारी निवासस्थान, पोलीस मुख्यालय, औरंगाबाद शहर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे बेगमपुरा, औरंगाबाद शहर येथे गु.र.नं.३६५/२०२० कलम ७ लाप्रका १९८८ अन्वये गुन्हा दाखल आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. रुपचंद वाघमारे, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ६०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार व त्यांचे एक सहकारी यांची ड्युटी न बदलण्यासाठी व प्रति महिना प्रत्येकी ३०००/- रु प्रमाणे असे दोघाचे मिळुन ६०००/- रु लाचेची मागणी केली म्हणून |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार व त्यांचे एक सहकारी यांची ड्युटी न बदलण्यासाठी व प्रति महिना प्रत्येकी ३०००/- रु प्रमाणे असे दोघाचे मिळुन ६०००/- रु लाचेची मागणी राजकुमार चांदणे, राखीव पोलीस उपनिरीक्षक, पोलीस मुख्यालय, औरंगाबाद शहर हे करित असले बाबतची तक्रार तक्रारदार यांनी दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, राजकुमार उत्तमराव चांदणे, राखीव पोलीस उपनिरीक्षक, पोलीस मुख्यालय, औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडे ६०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेवरून त्यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध पोलीस ठाणे बेगमपुरा, औरंगाबाद शहर येथे गु.र.नं.३६५/२०२० कलम ७ ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री. रुपचंद वाघमारे यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार गणेश पंडुरे, गोपाल बरंडवाल, रविंद्र देशमुख, रविंद्र अंबेकर, विलास चव्हाण यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

(रुपचंद म.वाघमारे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद